# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.७४५/२०२०/जळगांव मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.हुसेनखान हसनखान,<br>रा.राजू गॅस वेल्डींग दुकानाजवळ, अजमेरी गल्ली, तांबापूर, शिरसोली रोड, मु.पो.ता.जि.जळगांव. | १)पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव ता.जि.जळगांव.<br>२)पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव ता.जि.जळगांव. | पुरवठा तपासणी अधिकारी,<br>पुरवठा विभाग,<br>तहसिल कार्यालय, जळगांव.<br>ता.जि.जळगांव. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.१३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"दि.०१/०१/२०१७ ते दि.१३/११/२०१९ या कालावधीतील १) तांबापूर येथील रेशन दुकान क्र.३८/३ कडील असलेले APL, BPL व अंतोदय कार्ड धारकांची नावे. २) प्रत्येक महिन्यात मिळणारा धान्य कोठा व वितरीत (वाटप) होत असलेले धान्य याची संपूर्ण माहिती."

सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.०५/०१/२०२२ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.ए.आर.जाधव यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले नाही. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांचेकडे अधिनियमातील कलम ६(३) अन्वये हस्तांतरित केला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.अनिल पवार यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिलाच्या आदेशानुसार विहित कालावधीत माहिती न पुरविता १ वर्षानंतर माहिती पुरविली. म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत

त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.ए.आर.जाधव यांनी दि.०१/०४/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मी दि.१७/१०/२०१६ पासून दि.१०/०८/२०२० पर्यंत तहसिल कार्यालय जळगांव येथे पुरवठा निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. सदर कार्यकाळात तत्कालीन तहसिलदार श्रीमती वैशाली हिंगे यांनी काही कालावधीकरिता पुरवठा अव्वल कारकून या पदाचा मौखिक आदेशाने अतिरिक्त तात्पुरता कार्यभार माझेकडे सोपविणेत आलेला होता. परंतू जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांचेकडील आदेश क्र.आस्थाप-१/कावि/२०२०/१/१/१७५१ दि.०६/०८/२०२० अन्वये माझी बदली ही मंडळ अधिकारी चोपडा तहसिल कार्यालय चोपडा येथे झालेली असल्यामुळे पुरवठा निरीक्षक या पदावरुन दि.१०/०८/२०२० रोजी कार्यमुक्त होवून त्याच दिवशी मंडळ अधिकारी चोपडा ता.चोपडा जि.जळगांव या पदावर हजर झालेलो आहे. पुरवठा अव्वल कारकून या पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना अपिलार्थी श्री.हुसेनखान हसनखान रा.तांबापूर जळगांव यांनी दि.१३/११/२०१९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही व्यक्तीश: (अर्जात नमूद केलेप्रमाणे) मागितलेली होती. त्यानुसार मी अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती तयार करुन अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक ९६३७९९८९६६ वर संपर्क करुन आपणांस आवश्यक असलेली माहिती तयार असून ती माहिती घेवून जाणेबाबत सूचना दिली. त्यानुसार अपिलार्थी हे कार्यालयात येवून सदरची माहिती ही अस्पष्ट असल्यामुळे मला नको आहे असे सांगितले. त्यानुसार आवश्यक असलेली माहिती ही अस्पष्टच असल्यामुळे छायांकित प्रती सुध्दा अस्पष्ट असल्याचे अपिलार्थी यांना समजावून सांगितले. परंतू अपिलार्थी यांनी सदरची माहिती घेण्यास स्पष्ट नकार दिला होता व मी नंतर येवून सदरची माहिती घेवून जाईल असे सांगितले परंतू तद्नंतर अपिलार्थी हे माहिती घेण्यास आलेले नाही. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र.२ ची माहिती ही जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून श्री.अनिल पवार यांचेशी संबंधित होती. परंतू पुरवठा निरीक्षक तसेच पुरवठा अव्वल कारकून अशा दोन्ही पदाचा कार्यभार माझेकडे असल्यामुळे कार्यालयीन कामकाजाच्या व्यापामुळे अपिलार्थी यांचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अंव्वल कारकून श्री.अनिल पवार यांचेकडे वर्ग करावयाचे राहून गेले हे मला मान्य आहे. अपिलार्थी श्री.हुसेनखान हसनखान रा.तांबापूर जळगांव यांनी आपलेकडे केलेल्या द्वितीय अपिलाची सुनावणी दि.०५/०१/२०२२ रोजी गुगल मिटकोडद्वारे आयोजित करण्यात आलेली होती. परंतू त्याबाबत मला तोंडी अथवा लेखी सूचना पुरवठा शाखा, तहसिल कार्यालय जळगांव यांनी दिली नसल्यामुळे ऑनलाईन सुनावणीस हजर राहता आले नाही. याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करुन आपली माफी मागतो. तरी उपरोक्त खुलाशाचे अवलोकन करुन माझेवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येवू नये ही नम्र विनंती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.अनिल पवार यांनी दि.३१/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, आपण जळगांव शहरातील शॉप नं.६९, वॉर्ड क्र.३८/३ या रास्तभाव दुकानाची माहिती मिळणेबाबत मागणी केली, त्यानुसार सदरची माहिती विनामूल्य पुरविण्यात यावी असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५/०१/२०२० रोजी आदेश पारित केले आहे. त्यानुसार त्रयस्थ स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन पुरविण्याची असल्याने तसेच सदर

कालावधीत कोरोना व्हायरस (कोव्हीड-१९) ची साथ सुरु झाल्यामुळे आपणांस सदरची माहिती पुरविण्यात विलंब झालेला आहे. त्यामुळे दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. तरी देखील सदरची माहिती प्राप्त झालेली असल्याने आपणांस पानांक १ ते १५७ माहिती विनामूल्य यासोबत पुरविण्यात येत आहे. आपणांस असे देखील कळविण्यात येते की, सदर माहितीवरुन आपले समाधान होत नसल्यास, आपण स्वत: या कार्यालयात उपस्थित राहून आपणांस आवश्यक असलेल्या उक्त विषयाशी कार्यालयात उपलब्ध संबंधित संचिका / कागदपत्रांचे अवलोकन करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती अर्ज देऊन प्राप्त करुन घेऊ शकतात.

उपरोक्त परिच्छेदात नमूद वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.१३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.ए.आर.जाधव यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतेही उत्तर / माहिती दिलेली नाही तसेच मुद्दा क्र.२ ची माहिती जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव यांचेशी संबंधित असल्याने सदर मुद्दयाची माहिती देण्यासाठी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरित केलेला नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.ए.आर.जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) चे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा पुरवठा तपासणी अधिकारी, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दि.१३/०१/२०२० रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये १) जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून २) जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी माहितीचा अधिकारातील माहिती पुरविलेली नसल्याने हा आदेश पारित झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली अनुषंगीक परिपूर्ण माहिती नियमानुसार विनामूल्य पुरविण्यात यावी असे आदेश पारित केलेले असून त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.अनिल पवार यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविता विलंबाने दि.३१/१२/२०२० च्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. कोरोना व्हायरस (कोव्हीड-१९) ची साथ ही प्रथम अपिल निर्णयानंतर सुमारे दोन महिन्यांनी सुरु झालेली असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.अनिल पवार यांनी दिलेले विलंबाचे कारण संयुक्तिक नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.ए.आर.जाधव यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"**

या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव श्री.अनिल पवार यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.७४५/२०२०/जळगांव अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगांव ता.जि.जळगांव.

जावक क्र. ३६७

दिनांक :- 16 JAN 2026